# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ९० फुट रोड,
ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(१)(ब)अन्वये आदेश

Speed-Post

जा.क्र.: मुंबई/उपनि./आर-दक्षिण वि./७७ (१) (ब)/१२३४ /२०१६
दिनांक :२८/०९ /२०१६

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतूद.
२. या कार्यालयाचे जा.क्र.मुंबई उपनि आर दक्षिण विभाग/बी-३/तक्रार/कांदिवली सिल्वर/४८३/२०१६ दिनांक २६/०५/२०१६ रोजीचे पत्र व दिनांक ०३/०९/२०१६ चे पत्र
३. श्री के आर देसाई यांचे दि.२८/०७/२०१६ रोजीचे पत्र.

ज्याअर्थी, कांदिवली सिल्वर को-ऑप.हौ.सो.लि.,प्लॉट नं.४५ सिल्वर अपार्टमेंट आकुर्ली क्रॉस रोड नं.१, कांदिवली (पुर्व), मुंबई -४०० १०१. (यापुढे जिचा उल्लेख संस्था असा करण्यात आला आहे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ या मधील तरतूदीनुसार नोंदण्यात आलेली असुन ती, या कार्यालयाचे कार्यकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचा कारभार अधिनियम, नियम, संस्थेचे मंजूर उपविधी, शासनाने वेळोवेळी पारित केलेले आदेश, निर्देश व परिपत्रकीय सूचना यामधील तरतुदीनुसार चालविणे बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, श्री के.आर.देसाई तक्रारदार यांनी या कार्यालयाचे असे निर्देशनास आणुन दिले आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्यील ९७ दुरूस्ती नुसार सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणा मार्फत घेण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि संस्थेने दिनांक.२६/०९/२०१५ रोजीचे सभेत पुढील ५ वर्षाकरिता व्यवस्थापक समितीची निवड केलेली आहे. तसे कार्यालयाचे दिनांक.२६/०५/२०१६ अहवाल येथे नमुद केलेले आहेत.

वरील परिस्थिती विचारात घेता सहकारी संस्थांच्या निवडणुका मा. राज्या सहकारी निवडणुक प्राधिकरणा मार्फत घेण्याची कायदा कलमात दुरुस्ती केलेली असताना ही दिनांक २६/०९/२०१५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधरण सभेत व्यवस्थापक समितीची निवड केलेली आहे. सदरची कृती कायदयास संयुक्तीक नाही म्हणजेच अस्तित्वात असलेल्या समितीच्या कालावधी संपुष्टात आलेला असुन संस्थेवर संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता पोकळी निर्माण झाली आहे. सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील तरतुदीनुसार विद्यमान समितीला कारणे दाखवा नोटीस देणे व्यवहार्य होणार नाही म्हणुन स्वाधीकारे विद्यमान समिती निष्प्रभावित करुन संस्थेचे दैनदिन कामकाज पाहण्याकरिता / व्यवस्थापक समितीची निवडणुक घेण्याकरिता, नविन व्यवस्थापक समिती अस्तित्वात येईपर्यंत प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणुक करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली असल्याने मी खालोल प्रमाणे आदेश देत आहे.



Scanned by CamScanner

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (१) (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी डॉ.अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे कांदिवली सिल्वर को-ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.४५ सिल्वर अपार्टमेंट आकुर्ली क्रॉस रोड नं.१, कांदिवली (पुर्व), मुंबई -४०० १०१. या संस्थेस विद्यमान व्यवस्थापक समिती स्वाधिकारे निष्कासित करुन त्यांऐवजी श्री.संजय मांढरे, प्रमाणित लेखापरिक्षक, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नेमणुक करीत आहे.

त्यांनी संस्थेच्या दफ्तराचा ताबा घ्यावा व संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्यांच्या निवडणुकीबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व ६ महिन्याच्या आत नवनिर्वाचित व्यवस्थापक समितीकडे दफ्तराचा व मालमत्तेचा ताबा सुपूर्द करावा. प्राधिकृत अधिकारी यांना मानधन रु.२५००/- व प्रत्यक्षात होणारा प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

सदरचा आदेश आज रोजी दि.२८/६/२०१६ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

(डॉ. अविनाश भागवत)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई

प्रत :

१. अध्यक्ष, सचिव, खजिनदार व व्यवस्थापक समिती सदस्य सर्व, कांदिवली सिल्वर को-ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.४५ सिल्वर अपार्टमेंट आकुर्ली क्रॉस रोड नं.१, कांदिवली (पुर्व), मुंबई -४०० १०१.

२. श्री. के.आर.देसाई, सदनिका क्र.२, कांदिवली सिल्वर को-ऑप.हौ.सो.लि., ए विंग, प्लॉट नं.४५ सिल्वर अपार्टमेंट आकुर्ली क्रॉस रोड नं.१, कांदिवली (पुर्व), मुंबई -४०० १०१.

३. श्री. संजय मांढरे, प्रमाणित लेखापरिक्षक.

४. शाखा व्यवस्थापक, युको बँक, आकुर्ली रोड, कांदिवली (पुर्व), मुंबई - ४०० १०१.

५. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था -४, मुंबई.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई



Scanned by CamScanner